RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

# मानवधिकार व शिक्षण

**प्रा.संदिप भोंजिबा गोल्हार**
सहा.प्राध्यापक
सौ. निर्मलाताई थोपटे महाविद्यालय, भोर जि.पुणे

## प्रस्तावना

मानवी जीवनात हक्कांना महत्वाचे स्थान आहे. व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्यासाठी हक्क अत्यावश्यक असतात. मानव जातीची जन्मजात प्रतिष्टा, संमती, हक्क यांना प्राधान्य मिळविणे हे स्वातंज्य, न्याय, शांतता यांचे अधिष्ठान आहे. 10 डिसेंबर 1948 रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत मानवी हक्क जाहीरनामा मंजूर केला आहे. मानवी हक्कापासून कोणालाही वंचित ठेवता येणार नाही. हे या जाहीरनाम्यात स्पष्ट करण्यात आले आहे. भारतीय संविधानदेखील आपला उददेश पत्रिकेत सार्वभौमत्व, लोकशाही, गणराज्य, धर्मनिरपेक्षता व समानवादी ही तत्वे मान्य करण्यात आलेली आहे. या तत्वांचे पालन करण्यासाठी भारतीय संविधानाने भारतीय नागरिकांना समतेचा आधार, स्वातंज्याचा अधिकार, धर्मस्वातंज्याचा अधिकार, धर्मस्वातंज्याचा अधिकार, घटनात्मक उपाययोजनाचा हक्क, सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार हे अधिकार मूलभूत हक्क म्हणून मान्य केलेले आहेत. व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्यासाठी हक्क आवश्यक ठरते.

शिक्षण या मानवी हक्कात शिक्षण घेणे, प्राथमिक तसेच मूलभूत शिक्षण सक्तीचे व मोफत मिळावे, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण व्हावे, मानवी हक्क व मूलभूत स्वातंज्याचा विकास करणे हा शिक्षणाच हेतू असावा व पालकांना आपल्या पाल्यांना कोणते शिक्षण द्यावे, यांची निवड करण्याचा हक्क असेल. या बाबी अंतर्भूत आहेत.

### सक्तीचे व मोफत शिक्षण अधिनियम

भारतीय संविधानाने 86 व्या घटनादुरूस्तीने शिक्षणाचा अधिकार हा मूलभूत हक्क म्हणून संसदेने सन 2002 साली विधेयक संमत केले असून, त्याच्या योग्य राबवणुकीसाठी संविधानाने सक्तीच्या व मोफत शिक्षणाचा अधिनियम सन 2009 साली संमत केला असून, या दोन्ही बाबी 1 एप्रिल 2010 पासून अमलात आणल्या आहेत. घटनादुरूस्तीन्वये वनविलेल्या नियम भारतीय संविधानातील परिशिष्ट 21- ए मध्ये अंतर्भूत करण्यात आलेला आहे. त्यानुसार 6-14 वयोगटातल मुलांना शिक्षणाचा अधिकार मूलभूत हक्क म्हणून प्रदान करण्यात आलेला आहे.

## मानवी हक्क शिक्षण

### मानवी हक्क शिक्षणाचा अर्थ

व्यक्तीला निसर्गाकडून प्राप्त झालेले असे अधिकार की ज्याशिवाय माणूस म्हणून जगणे अशक्य आहे.

प्रत्येक स्त्री आणि पुरूष यांना रंग, लिंग, वंश इ. भेदाशिवाय केवळ मनुष्य म्हणून मिळालेले अधिकार म्हणजे मानवी हक्क होय.

### मानवी हक्क शिक्षणाचे महत्व

मानवी हक्कांचे संरक्षण करून माणसाला माणूस म्हणून जगता यावे यासाठी योग्य अशी परिस्थिती निर्माण करण्याची गरज पूर्ण करता येते, म्हणजेच वैयक्तिक सन्मान, अभिव्यक्ती स्वातंज्य, दुर्वल घटकांचे संरक्षण याकरिता मानवी हक्कांच्या संरक्षणाची आवश्यकता आहे.

### 1) वैयक्तिक स्वातंज्य

प्रत्येक व्यक्तीला आपल्या मनाप्रमाणे जीवन जगता यावे म्हणून विशिष्ट प्रकारचे स्वातंज्य आवश्यक असते. प्रत्येक व्यक्तीला आपल्या देशाच्या सीमेच्या आत कोठेही वास्तव्य करण्याचा हक्क आहे. आपला सन्मान राखण्यासाठी

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

काही वेळा देशातून परदेशात जावे लागते व गरजेनुसार मायदेशी परत येणे हा व्यक्तीचा मुलभूत हक्क आहे म्हणजेच वैयक्तिक स्वातंज्य टिकविण्यासाठी मानवी हक्कांचे संरक्षण होणे गरजेचे आहे.

**2) वैयक्तिक सन्मान**

एखादया पशूप्रमाणे जीवन व्यतित करणे हे माणसाचे ध्येय नसते तर प्रत्येक माणसाला माणूस म्हणून जगता येणे आवश्यक आहे. तसेच त्याला समाजात जगता आले पाहिजे. आपल्याला सन्मान मिळावा असे प्रत्येक व्यक्तीला वाटत असते व त्यात काही गैर आहे असे नाही.

## मानवी हक्काचे प्रकार - नैसर्गिक सकारात्मक, नकारात्मक आणि कायदेशीर

### नैसर्गिक हक्क

प्रत्येक व्यक्तीस जन्मतःच हक्क प्राप्त झालेले आहेत. कोणताही मानव किंवा शासन कोणत्याही व्यक्तिस त्याच्या हक्कापासून वंचित ठेवू शकत नाही अथवा हिरावून घेऊ शकत नाही. व्यक्तिसह हक्क स्वभावातून निसर्गतः प्राप्त झालेले आहेत हा उद्देश आहे. दुस-या शब्दांमध्ये व्यक्तीला स्वभावतःच काही विशिष्ट हक्क जन्माबरोबरच प्राप्त होतात आणि हे हक्क अदेय म्हणजेच देऊन टाकता न येणारे आहेत.

### नकारात्मक हक्क

नकारात्मक मानवी हक्क म्हणजे जे हक्क राष्ट्रांवर बंधनकारक आहेत आणि राष्ट्रांना काही कृत्ये करण्यापासून प्रतिबंध करतात. या हक्कांचे उल्लंघन होऊ नये किंवा ते व्यक्तिपासून हिरावून घेतले जाऊ नये, म्हणून हे हक्क सभासद राष्ट्रांसाठी आवश्यक करण्यात आलेले आहेत.

कलम **19** नुसार स्वातंज्य आणि अभिव्यक्ती स्वातंज्याचा हक्क बहाल करण्यात आला. प्रत्येक व्यक्तीस स्वतःच्या विकासासाठी विचारस्वातंज्याचा आणि अभिव्यक्ती स्वातंज्याचा हक्क आहे. या हक्कांचे संरक्षण करणे राज्यावर बंधनकारक करण्यात आलेले आहे.

कलम **18** नुसार स्वातंज्याचा आणि धार्मिक स्वातंज्याचा हक्क बहाल करण्यात आला. राज्य कोणत्याही व्यक्तीस त्याच्या धर्म आणि धार्मिक परंपरा निवडण्यापासून रोखू शकत नाही. स्वेच्छेविरूद्ध अटक, अमानुष, यातनादायक अनिष्ट शिक्षा किंवा वागणूक यापासून मुक्ततेचा हक्क हे या प्रवर्गात येतात. नकारात्मक हक्क राज्याचा अधिकारावर आणि सत्तेवर प्रतिबंध आणतात. प्रत्येक व्यक्तीस राजकीय अधिका-यापांसून सरंक्षण मिळते. राज्याने वापरलेल्या नकारात्मक हक्कांच्या बंधनावर नियंत्रण करण्याचे काम देशातंर्गत न्यायिक यंत्रणेकडे आणि मानवी हक्क आयोगाकडे सोपविण्यात आलेले आहे.

### सकारात्मक मानवी हक्क

सकारात्मक मानवी हक्क म्हणजे ज्या हक्कानुसार राष्ट्रांनी सुविधा पुरविल्या पाहिजे किंवा त्यांचा उपभोग घेणे प्रत्येकास शक्य व्हावे अशी परिस्थिती निर्माण करणे होय. या स्थितीशिवाय कोणतीही व्यक्ती आपल्या मानवी हक्कांचा उपभोग घेऊ शकत नाही. जागतिक जाहीरनाम्यातील कलम **3** मधील जीविताचा हक्क हे सकारात्मक मानवी हक्काचे उदाहारण होय.

मानव हा समाजशील आहे, आणि म्हणूनच जीवनमानकांसह प्रतिष्ठेने जगण्यास मानव पात्र आहे. सन्माजनक जीवनासाठी राज्याने प्रत्येक व्यक्तीस शिक्षण, आरोग्य प्रदूषणमुक्त वातावरण, इ. सुविधा पुरविल्या पाहिजेत. वरिल सुविधांशिवाय कोणत्याही व्यक्तिस स्वतःचा विकास करता येणे शक्य नाही.

### कायदेशीर हक्क

भारतीय राज्यघटनेत भारतातील प्रत्येक हक्क प्रदान केले आहे. यात मुलभूत अधिकाराचा समावेश होतो. राज्यघटनेत मूलभुत हक्कांना सर्वोच्च प्राथमिकता देण्यात आली आहे. मूलभुत हक्कांसाठी घटना समितीच्या बैठकित डिसेंबर **1946** मध्ये समिती नेमण्यात आली. मूलभूत हक्कांमध्ये कोणत्या हक्कांचा समावेश असावा, याबावत घटना समितीपुढे समस्या होती. मूलभूत हक्क आणि राज्याची धोरणाविषयक मार्गदर्शक तत्वे असा फरक करण्यात आला. सर्वो

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

च्च न्यायालय आणि उच्च न्यायालयात यांना मूलभूत अंमलबाजवणीचे अधिकार दिलेले नाहीत. मूलभूत अधिकार दिलेले नाहीत. मूलभूत हक्कांमध्ये अल्पसंख्यांक, अस्पृश्य समाज यांचा समावेश आहे.

'जगातील स्वातंत्र्य, न्याय आणि शांतता यांचा पाया म्हणजे मानवी प्रतिष्ठेचा आदर हा आहे' - मानवी हक्क जाहीरनामा यात समावेश आहे. जे हक्क जगण्यासाठी आवश्यक असतात त्या हक्कांना मानवी हक्क असे येते. सर्व मूलभूत हक्क हे मानवी हक्क असतात, परंतु सर्व मानवी हक्क हे मृत नसतात.

**संविधानाने दिलेले हक्क**

1. स्वातंत्र्याचा हक्क
2. समानतेचा हक्क
3. शोषणाविरूध्द्चा हक्क
4. धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क
5. संस्कृती व शिक्षणाचा हक्क
6. न्यायालयीन संरक्षणाचा हक्क
7. संपत्ती विषयक हक्क

44 व्या घटनादुरूस्तीनुसार संपत्तीविषयक अधिकार रद्द करण्यात सहा मूलभूत अधिकार अस्तित्वात आले.

## संवेदनक्षम आणि वंचित गटाचे हक्क

स्थलांतरीत/ निर्वासीत /वृध्द / अल्पसंख्यांक इत्यादी गट मुळातच कमजोर असतात, त्यामुळे त्यांच्यावर बलिष्ठंकडून पूर्वापार सतत अन्याय होत आले आहे. सामान्य हक्कांपासून ज्यांना सामाजिक, आर्थिक, शारीरिक कारणामुळे दूर रहावे लागते त्यास वंचित असे म्हणतात. वंचित घटकामध्ये स्त्रिया, वर्गीकृत जाती व जमाती, आदिवासी व अपंग यांचा समावेश होतो.

**स्त्रिया**

राष्ट्रसंघाच्या आमसभेने 7 नोव्हेंबर 1967 रोजी स्त्रियांविरूध्द होणा-या भेदभावाला विरोध करणारा जाहीरनामा स्वीकारला आणि त्यातील तत्वांची अंमलवजावणी करण्यासाठी स्त्रियांविरूध्द होणा-या सर्व भेदभावांचे समूळ उच्चाटन करणारा करारनामा - महिला विरूध्द सर्व भेदभाव निर्मूलनासाठी ठराव ( Convention against the Elimination of all forms of Discrimination against Women – CEDAW) स्वीकारला. या करारानाम्यानुसार सर्व सदस्य राष्ट्रांनी स्त्रियांविरूध्द होणा-या भेदभावाला मिटवण्यासाठी आवश्यक ती पावले उचलली पाहिजेत. यात शिक्षण, रोजगार, आरोग्यसेवा, आर्थिक व सामाजिक जीवन आणि कायदयासमोर समानता या बार्वीचा समावेशा आहे.

**बालके**

20 नोव्हेंबर 1989 या जाहिरनाम्याला 30 व्या वर्धापन दिनी बालहक्कांचा जाहीरनामा सर्वानुमते स्वीकारला गेला आणि 2 सप्टेंबर 1990 रोजी तो प्रत्यक्ष बालकांचा समावेश आहे. या जाहीरनाम्यात जीवताचा हक्क, राष्ट्रीयत्वाचा हक्क, अभिव्यक्तीचा हक्क , बालमजुरांचा शोषणविरोधी हक्क, कौटुंबिक वातावरणाचा हक्क, शिक्षणाचा हक्क, इ.चा. समावेश आहे.

**स्थलांतरित कामगार**

राष्ट्रसंघाच्या आमसभेने 18 डिसेंबर 1990 'सर्व स्थलांतरीत कामगार आणि त्यांच्या कुटुंबियाचे हक्क संरक्षित करणारा आंतरराष्ट्रीय करारनामा' पारित केला. जाहीरनाम्यानुसार स्थलांतरीत कामगारांना कोणतेही राज्य, त्यांचे जनमत असलेले राज्य, कोणत्याही बंधनाशिवाय सोडण्याचा किंवा पुन्हा प्रवेश करण्याचा व राहण्याचा अधिकार, कायदयाखाली जीविताच्या हक्काची जपणूक, छळ, अपमानित किंवा क्रूर वागणूक या शिक्षेपासून रक्षण, गुलामगिरी किंवा दास्यत्वापासून रक्षण, जुलूमाने मालमत्ता हिरावली जाण्यापासून संरक्षण देण्यात आले आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

**निर्वासीत लोक**

कलम 15 नुसार प्रत्येक माणसाला राष्ट्रीयत्वाचा हक्क आहे आणि तो हक्क विनाकारण किंवा बळजबरीने हिरावून घेता येणार नाही .

**अपंग व्यक्ती**

मानसिक अपंग व्यक्तींच्या हक्कांचा जाहीरनामा (1979) व अपंग व्यक्तीच्या हक्कांचा जाहीरनामा (1975) या नुसार अपंग व्यक्तीच्या हक्कांची उदघोषणा या यंत्रणेत करण्यात आलेली आहे. मानसिक व शारीरिक अपंगत्व असलेल्या लोकांची टक्केवारी खूपच जास्त प्रमाणात आहे. अशा व्यक्तींना मूलभूत प्राथमिक शिक्षणापासून वंचित ठेवले जाते व त्यांना पुरेसे पैसे मिळत नाही. जीवनाच्या सांस्कृतिक आणि सामाजिक प्रवाहापासून दूर फेकले जाऊ नये म्हणून जाहिरनाम्यात त्यांच्या हक्करची तरतूद करण्यात आली आहे .

**मुळवंशीय लोक**

1991 मध्ये स्वतंत्र राष्ट्रातील मूळवंशीय आणि आदिवाशी लोकांशी संबंधित करारनामा स्वीकारला. गरिबी आणि निरक्षरता यामुळे मूळवंशीय लोक ( बाहेरून येऊन स्थायिक झालेल्या लोकांच्या आधीपासून त्या भूमीवर राहणारे लोक) या भूमीवर अधिपत्य नसून ते राज्यातील इतर रहिवासींयाप्रमाणे मुलभूत हक्क उपभोगू शकत नाही. म्हणून प्रत्येक राष्ट्रानी त्यांना त्यांच्या भूमीवर सांस्कृतिक हक्क देणे आणि त्यांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करणे आवश्यक आहे .

**वृध्द व्यक्ती**

1991 मध्ये आमसभेने एक ठराव स्वीकारला ज्यामध्ये वृध्दांकरिता 18 तत्वांचा समावेश करण्यात आला. या तत्वांत वृध्दाचे स्वातंत्र्य, सहभाग, काळजी, स्वयंपूर्तता आणि सन्मान यांचा समावेश आहे. शारीरिक दुर्बलता, अपुरे पैसे, खालावत जाणारे आरोग्य अशा प्रमुख अडचणी वृध्दांच्या असतात. शहरीकरण व कुंटुंबव्यवस्था यामध्ये झालेल्या बदलामुळे वृध्दांसाठी गंभीर समस्या निर्माण झाली. दुसरी वार्ध्यक्य महासभा चे आयोजन एप्रिल 2002 मध्ये मद्रीद येथे करण्यात आले. यात वृध्दांच्या हक्कांवाबतची काळजी, आंतरराष्ट्रीय कृती योजना आणि राजकीय जाहीरनामा मान्य केला व सर्व विकास योजनामध्ये वृध्दत्वाचा समस्यांचा समावेश करण्यात आला .

**अल्पसंख्याक**

1952 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने राष्ट्रीय अथवा धार्मिक वा भाषिक अल्पसंख्याक लोकांच्या हक्कांचा जाहीरनामा स्वीकारला. या जाहिरनाम्यात 9 कलमे असून यात सर्व अल्पसंख्याकांच्या हक्कांचे संवर्धन आणि संरक्षण व ते राहत असलेल्या देशात राजकीय आणि सामाजिक स्थैर्य लाभण्यास मदत करणे यांचा समावेश होता. नागरी आणि राजकीय हक्कांच्या आंतरराष्ट्रीय करारनाम्यातील, कलम 27 मध्ये धार्मिक, वांशिक, भाषिक आणि राष्ट्रीय अल्पसंख्याकांचे सांस्कृतिक, धार्मिक आणि भाषिक हक्क कोणीही हिरावून घेऊ शकत नाही असे सांगितले आहे .

अधिनियमाव्दारे भविष्यातील सक्षम भारताचे स्वप्न साकार करण्याची एक नवी दिशाच दर्शविली आहे. कारण शिक्षण हाच भविष्यातील सक्षम, कार्यक्षम व वैचारिकतेने परिपूर्ण नागरी समाजाचा मापदंड ठरणार आहे. भारतीय संविधानाने शिक्षणाचा हक्क मूलभूत हक्क प्रदान करून उद्याच्या भविष्यातील सक्षम भारतीय समाजाचा पायाच मजबूत केला आहे. शासनाने उचललेले हे पाऊल निश्चितच भारताला महासत्ता बनविण्याच्या कामी मदतगार ठरणार आहे

## संदर्भ

1. शैक्षणिक तत्वज्ञान - म .वा. कुंडले
2. स्त्री मुक्तीचा आत्मस्वर - तारा भवाळकर श्रीविद्या प्रकाशन पुणे .
3. माधव कवि (1999), महिला कल्याण व विकास विद्या प्रकाशन, नागपूर डॉ .किशोच चव्हाण
4. शिक्षणतरंग ( मार्च 2012), इनसाईट पब्लिकेशन नाशिक .